# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## सहायक कुलसचिव/सहायक नियंत्रक व प्रयोगशाळा परिचर या पदांकरिता लेखी परिक्षेसंबंधी महत्वाच्या सुचना

१. विद्यापीठाने संबंधित पदावर नियुक्ती करण्याकरीता विहीत केलेल्या लेखी परिक्षेमध्ये उमेदवाराने मिळविलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार गुणानुक्रमे उमेदवारांची अंतिम निवड करण्यांत येईल. गुणवत्ता यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

२. शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जुन, २००८ अन्वये गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवारास लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

३. लेखी परिक्षेच्या निकालाच्या आधारे उमेदवारांना जाहीरात झालेल्या पदांची संख्या विचारात घेवून योग्य प्रमाणात मुळ कागदपत्राची तपासणी करण्याकरिता बोलविण्यात येईल. उमेदवारास एमकेसीएल यांनी पुरविलेला पीडीएफ अर्जाची प्रत सोबत आणून त्यासोबत जाहीरातीचे अनुषंगाने त्यावेळेस सादर केलेले सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती तपासण्याकरीता सोबत आणाव्यात व मागीतल्यानंतर तपासणीकरीता उपलब्ध करून द्याव्यात.

४. उपरोक्त पदाच्या लेखी परिक्षेनंतर उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी करण्यात येणार असुन एखादा उमेदवार प्रमाणपत्र पडताळणी दरम्यान अपात्र आढळल्यास त्याची लेखी परिक्षेतील गुणवत्ता ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र असला तरी अशा उमेदवारांना निवड प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवारांचे प्रमाणपत्र पडताळणीबाबतचे वेळापत्रक नंतर विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

५. उमेदवाराने सदर प्रवेश पत्रावर स्वतःचा अलिकडील काळातील फोटो लावुन स्वतःची स्वाक्षरी करावी. प्रवेश पत्रावर केलेली स्वाक्षरी, उत्तर पत्रिकेवरील स्वाक्षरी, परिक्षेवेळी उपस्थिती पत्रकावर केलेली स्वाक्षरी आणि अर्जावर केलेली स्वाक्षरी एकच असलेबाबतची खातरजमा केली जाईल. त्यात तफावत आढळुन आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

६. उमेदवारांनी लेखी परिक्षेकरिता येतांना सोबत कुठलेही एक ओळखपत्र, जसे की आधार कार्ड, वाहन चालवण्याचा परवाना, मतदान कार्ड, पॅन कार्ड सोबत आणावे.

७. सदर प्रवेश पत्र उमेदवाराने परिक्षेच्या दरम्यान सोबत बाळगावे व संबंधित अधिका-याने विचारणा केल्यास उपलब्ध करून द्यावे.

८. परिक्षार्थीने परिक्षा स्थळी किमान अर्धा तास अगोदर उपस्थित राहुन आसन व्यवस्थेची माहिती करून घ्यावी.परिक्षा सुरू झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना १५ मिनीटांनंतर परिक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही तसेच परिक्षा सुरू झाल्यापासून परिक्षा संपेपर्यंत कोणलाही परिक्षा हॉल मधून बाहेर जाता येणार नाही.

९. परिक्षार्थीने लेखी परिक्षे दरम्यान कुठल्याही प्रकारच्या गैरमार्गाचा अवलंब अथवा राजकीय सामाजिक अथवा वरिष्ठ शासकीय/निमशासकीय अधिकारी यांचे कडुन कुठल्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचे आढळल्यास संबंधित परिक्षार्थीस परिक्षेकरीता/निवड करावयाचे पदाकरीता अपात्र ठरविण्यांत येईल.

१०. उपराक्त लेखी परिक्षेला उपस्थित राहण्यास विद्यापीठाव्दारे आपणांस कोणत्याही प्रकरचा प्रवास भत्ता, दैनंदिन भत्ता वा येण्या जाण्याचे भाडे दिले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

११. संबंधित उमेदवार विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या संदर्भाधिन जाहीरातीमधील आवश्यक अटी व शर्ती अथवा शैक्षणिक अर्हता/धारण करीत नसल्यास त्याने उक्त प्रवेश पत्र दुर्लक्षित करावे व अशा उमेदवाराने सदर परिक्षेला उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही.

१२. उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी लागणारे सर्व साहित्य उदा. बॉलपेन, पेन्सील, रबर इ. स्वतः सोबत आणावे.

१३. परिक्षेची वेळ संपल्यानंतर उमेदवाराने प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका संबंधीत पर्यवेक्षकाकडे परत करणे आवश्यक आहे. यापैकी कोणतेही साहित्य परिक्षा कक्षाच्य बाहेर नेल्यास / नेल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवारांविरूद्ध फौजदारी दंड संहितेनुसार (आय.पी.सी.) तसेच परिक्षा गैरप्रकार अधिनियम अन्वये कार्यवाही करण्यात येईल. याची कृपया संबंधीत उमेदवाराने नोंद घ्यावी.

१४. उत्तर पत्रिकांची तपासणी ओ.एम.आर. या संगणकीय पद्धतीने होणार असल्यामुळे कृपया उत्तरपत्रिकेची घडी करू नये किंवा चुरगाळू नये तसेच उत्तरपत्रिका खराब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१५. उत्तर पत्रिकेमध्ये उत्तर नमुद करताना पुर्ण विचारांती उत्तर नमुद करावे. खाडाखोड केलेले एकापेक्षा अधिक पर्याय अर्धवट वर्तुळात भरलेले असे कोणतेही उत्तर ग्राह्य धरण्यात येणार नाही व त्यासाठी गुण दिले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१६. उत्तर पत्रिकेची तपासणी ओ.एम.आर. या संगणकीय पद्धतीने केली जाणार असल्याने त्यात मानवी हस्तक्षेप / फेरबदलास अजिबात वाव नाही त्यामुळे उमेदवाराची कोणत्याही प्रकारची गुणपडताळणी अथवा फेर तपासणीची विनंती मान्य केली जाणार नाही.

१७. परिक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतःजवळ भ्रमणध्वनी (मोबाईल) अन्य संपर्क येत्र, गणकयंत्र इत्यादी कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साधने बाळगणे, तसेच कोणत्याही प्रकारचे लिखीत छापील साहित्य स्वतःजवळ बाळगणे, त्याचा वापर करणे, इतर उमेदवाराशी संपर्क साधणे किंवा कोणत्याही गैरप्रकारांचा अवलंब केल्याचे कोणत्याही क्षणी आढळून आल्यास उमेदवारास लेखी परिक्षेकरीता व या पदाकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

१८. ओ.एम.आर. संगणकीय पद्धतीच्या उत्तरपत्रिकेमध्ये प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार वर्तुळे दिलेले असतील, त्या वर्तुळामध्ये बरोबर असणा-या उत्तराचा पर्याय गडद काळ्या बॉलपेन शाईने ठळकपणे भरावयाचा आहे.

१९. कुठल्याही पुर्व सुचने शिवाय परिक्षे संबंधी अनुषंगिक व्यवस्था प्रक्रिया खंडीत किंवा रद्द करणे अथवा त्यात बदल करणे याबाबतीत सर्व अधिकार कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी राखुन ठेवले आहे.

स्वाक्षरीत/-

**कुलसचिव,**

**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## सहायक कुलसचिव/सहायक नियंत्रक या पदाचे लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | मराठी | : | मराठी या विषयांचा प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील. | ५० गुण |
| २. | इंग्रजी | : | स्पेलींग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमींच्या शब्दांचा वापर, साहित्यीक इत्यादी. | ५० गुण |
| ३. | सामान्यज्ञान | : | दैनंदिन घटना, चालू घडामोडी, धर्म, साहीत्य, राजकारण, शास्त्र, सामाजिक व औद्योगिक सुधारणा, क्रिडा क्षेत्रातील महान व्यक्तींची कार्ये, सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करून महाराष्ट्राच्या इतीहासाची व भूगोलाची रूपरेषा यावरील संबंधित प्रश्न. | ५० गुण |
| ४. | बौद्धिक चाचणी | : | उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करू शकतो हे आजमाविण्यासाठी प्रश्न. | ५० गुण |
| | | | **एकुण** | **२०० गुण** |

लेखी परिक्षा २ तासांची २०० प्रश्नाची व २०० गुणांची असून वरील ४ विषयांची एकच प्रश्न पत्रिका असेल व लेखी परिक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहूपर्यायी असतील.परिक्षेचे माध्यम इंग्रजी विषय वगळता इतर विषयांचे माध्यम मराठी असेल. इंग्रजी विषयांचे प्रश्न इंग्रजीतच विचारण्यात येतील.

स्वाक्षरीत/-

**अध्यक्ष**

**ईतर अधिकारी निवड समिती**

# <u>डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला</u>

## <u>प्रयोगशाळा परिचर या पदाच्या लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम</u>

१. मराठी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमींच्या शब्दांचा वापर व मराठी या विषयांचा प्रश्न पत्रिकेचा दर्जा शालांत परीक्षेच्या इयत्ता (१० वी) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहील.

२. इंग्रजी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमींच्या शब्दांचा वापर इंग्रजी या विषयांचा प्रश्न पत्रिकेचा दर्जा शालांत परीक्षेच्या इयत्ता (१०वी) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहील.

३. सामान्यज्ञान :- दैनंदिन घटना, राजकारण, शास्त्र, सामाजिक व औद्यागिक सुधारणा,क्रिडा क्षेत्रातील महान व्यक्तींची कार्ये, सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करून महाराष्ट्राच्या इतिहासाची, तसेच भूगोलाची रूपरेषा यावरील प्रश्न.

४. बौध्दीक चाचणी :- उमेदवार किती जलद व अचुकपणे विचार करून शकतो हे अजमिविण्यासाठी प्रश्न.

अ.क्र. १ व ४ मधील विषयानुसार प्रयोगशाळा परिचर या पदाची २०० प्रश्नाची लेखी परीक्षा असुन प्रत्येकी १ गुण अशी एकुण २०० गुणांची परिक्षा ठेवण्यात आलेली आहे. तसेच लेखी परीक्षेचा कालावधी २ तासाचा राहील. परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे राहील.

१. मराठी (५० प्रश्न ५० गुण)
२. इंग्रजी (५० प्रश्न ५० गुण)
३. सामान्यज्ञान (५० प्रश्न ५० गुण)
४. बौध्दीक चाचणी (५० प्रश्न ५० गुण)

वरील विषयाची एकच प्रश्न पत्रिका असेल व लेखी परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असेल. परीक्षेचे माध्यम इंग्रजी विषय वगळता इतर विषयाचे माध्यम मराठी असेल इंग्रजी विषयाचे प्रश्न इंग्रजीतच विचारण्यात येतील.

स्वाक्षरीत/-

**अध्यक्ष**

**क व ड वर्ग निवड समिती**